नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३०/१२/२०२५ (मंगळवार )

---

# नागपूर ग्रामीण पोलिसांनी प्रथमच गोवंश जनावराची कत्तलीकरीता तस्करी/वाहतुक करणाऱ्या १२ आरोपींच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम ( MCOCA) अन्वये कारवाई केलेली आहे.

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— **मा. नामदार श्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी घोषणा केली होती की, सतत गोवंशाची वाहतुक करणाऱ्या गुन्हेगारांच्या संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम MCOCA अन्वये कठोर कारवाई करण्यात येईल. नागपुर ग्रामीण जिल्हयात मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात कळमेश्वर पोलीसांनी अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकामी तस्करी करणाऱ्या टोळीचा प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण १२ आरोपीतांच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकामी तस्करी करणाऱ्या टोळीवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कारवाई करणारा नागपुर ग्रामीण जिल्हा हा शक्यतो महराष्ट्र राज्यातील पहीलाच जिल्हा आहे.**

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दिनांक १६/११/२५ रोजी पहाटे कळमेश्वर पोलीसांना डायल ११२ वर माहीती प्राप्त झाली की, फेटरी येथे नागपुर ते काटोल रोडवर एका ट्रकला आग लागली आहे. कळमेश्वर पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन पाहणी केली असता एक टाटा कंपनीचा ट्रक क्रमांक एम एच ४० सी.डी ५०९४ हा जळतांना दिसला. वाहन चालकाबाबत विचारपुस केली असता चालक घटनास्थळावरून पळुन गेल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी तात्काळ अग्निशमन दलास बोलावुन आग विझविली. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी

केली असता त्यात गोवंश जनावरे दिसुन आली.नमुद जनावरे दोरखंडाने बाधुंन निर्दयतेने कोंबुन असल्याचे दिसुन आले. एकुण ३७ जानावरे मिळुन आली पैकी २९ जनावरे मृत पावली होती तसेच ८ गोवंश जनावरांना वाचविण्यात यश आले. जनावरांना राउळगाव येथील जैन गोशाळेत दाखल करण्यात आले. नमुद वाहन चालक आरोपी याने अवैधरित्या जनावरांची वाहतुक करीत असतांना त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालविण्याने वाहनाचा टायर फुटला. टायर फुटल्यानंतर सुध्दा नमुद चालक आरोपी याने दुघर्टना होवु शकते हे माहीती असतांना सुध्दा सदर वाहन न थांबविता चालवित राहील्याने रोडचे आणि टायरचे घर्षण झाल्याने आग लागली. टायर ने पेट घेतल्यानंतर सुध्दा आरोपीने नमुद वाहन महामार्ग क्र एन एच ३५३ जे वर चालविल्याचे रोड चे सुध्दा नुकसान झाले. वाहनाला लागलेल्या आगी मुळे नजिकच्या वस्त्यामध्ये जिवीत हानी होवु शकते हे आरोपीला माहीती असतांना सुध्दा तो पेटलेला ट्रक सोडुन पळुन गेला. **सदर प्रकरणी नमुद आरोपीवर कळमेश्वर पोलीस स्टेशन येथे ३२६(ग), ६१(२), भा. न्या.सं ५(१),(अ) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम , ११(१) (ड) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १३४/१७७ मोटर वाहन अधिनियम, ८ (ब) राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, ३ (१) सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम , कलम ७ फौजदारी सुधारणा कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.**

**पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन** आरोपी क्रं. १) **टोळी प्रमुख** नामे मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी, वय ४० वर्षे, रा. महेंद्र नगर, बुर्ज खलीफा हॉटेल जवळ, टेका नाका, नागपुर हा असुन टोळी सदस्य २) **वाहन चालक** सैयद सुल्तान उर्फ सोनु हमीद अली वय ३३ वर्षे रा. महेंद्र नगर, पाण्याचे टाकी जवळ, आजरी –माजरी यशोधरा नगर, नागपुर, **जनावरे वाहनात भरणारे** आरोपी क्रं ३) आमीर रउफ कुरेशी, वय २९ वर्षे, रा. महेंद्र नगर पाण्याची टाकी, पाचपावली नागपुर आणि ४) रफीक कुरेशी शेख सत्तार कुरेशी, वय ३२ वर्षे, रा. टेका नाका, पाण्याचे टाकीजवळ, नागपुर, **जनावरे खरेदी–विक्री करणारा तसेच सालेकसा जि. गोंदीया येथून कापसी, नागपूर पर्यंत जनावरे आणनारा वाहण चालक–मालक** ५) शोहेब नौशाद सैयद वय २६ वर्षे रा. बुरड मोहला,लाखनी जि.भंडारा, **गोंदिया जिल्हयातुन अवैधरित्या जनावरांचा पुरवठा कराणारा** ६) मनोहर भोजराज मनगटे वय २६ वर्षे रा. पानगाव पो.स्ट सालेकसा **जनावरे खरेदी विक्री मध्ये मध्यस्थी** आरोपी ७) इख्तियार कुरेशी मुश्ताक कुरेशी वय ३३ वर्षे रा. प्रवेश

नगर, यशोधरा नगर **तसेच सदर गुन्हयात मदत करणारे इतर ५ पाहीजे आरोपी (टोळी सदस्य) अशा एकुण १२ आरोपीतांची टोळी ही अवैधरित्या गोवंशाची कत्तलीकरीता तस्करी/वाहतुक, खरेदी विक्री आणि इतर सहकार्य करतात.**

नमुद संघटीत गुन्हेगारीचा टोळी प्रमुख हा मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी, वय ४० वर्षे, रा. महेंद्र नगर, बुर्ज खलीफा हॉटेल जवळ, टेका नाका, नागपुर हा आहे. सदर टोळी प्रमुखाकडे जनावरांची वाहतुक करण्याकरीता स्वत:ची १२ चक्का ट्रक आहेत. सदर टोळी प्रमुख हा लगतच्या राज्यातुन अवैद्यपणे जनावरांची कत्तली करीता वाहतुक करीत असतो. त्याकरीता टोळी प्रमुख हा लगतच्या छत्तीसगड राज्यातुन त्याचे टोळी सदस्यांकडुन गोवंश जातीचे जनावरे गोळा करुन त्यांना भंडारा जिल्हयातील पानगाव ता. सालेकसा या छत्तीसगड राज्याच्या सिमेलगत असलेल्या जंगलातील गावात आपल्या टोळी सदस्याकडुन जनावरे गोळा करुन ठेवतो. ती जनावरे त्याच्याच टोळी सदस्याचे मार्फतिने टाटा पिकअप सारख्या छोटया वाहनात भरुन नागपूर लगत असलेल्या निर्मनुष्य जागेत रात्रीच्या वेळी वाहतुक करुन बोलावितो. नमुद जनावरांना छोटया वाहनातुन आपल्या मालकीचा ट्रकमध्ये आपल्या टोळी सदस्याकरवी निर्दयीपणे कोंबुन भरतो. सदर ट्रक हा त्यांचे पुढील टोळी सदस्यांकडे कत्तली करीता अमरावती येथे पाठवितो. अमरावती येथुन सदर जनावरे पुढे कत्तली करीता विक्री करतो. अशाप्रकारे रात्रीच्या वेळी आपले अवैध गुन्हे करतो. सदर वाहनास कुठे अडथळा येवु नये म्हणुन कारने जनावर वाहतुकीच्या वाहनाच्या पुढे राहुन स्वत: किंवा टोळी सदस्यांच्या मदतीने पाळत ठेवतो त्यांना मदत करीत असतो. अशाप्रकारे शिताफिने आपली संघटीत गुन्हेगारी करीत असतो.

वरील संघटित गुन्हेगार टोळी प्रमुख मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी याचेवर पोलीस स्टेशन सिवनी, चांद, लोधीखेडा राज्य मध्यप्रदेश, तसेच पोलीस स्टेशन पारशिवणी आाणि पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अवैधरित्या गोवंश जनावरांची तस्करीचे गुन्हे नोंद आहे. टोळी सदस्य आरोपी सैयद सुल्तान उर्फ सोनु हमीद अली याचेवर पोलीस स्टेशन कामठी, नागपुर शहर, पोलीस स्टेशन मौदा, कळमेश्वर, नागपुर ग्रामीण, पोलीस स्टेशन साकोली जि भंडारा येथे गुन्हे नोंद आहे. टोळी सदस्य आरोपी आमीर रउफ कुरेशी याचेवर पोलीस स्टेशन तिवसा, जि अमरावती पोलीस स्टेशन कळमेश्वर, नागपुर ग्रामीण येथे गुन्हे नोंद आहे . टोळी सदस्य आरोपी रफीक कुरेशी शेख सत्तार कुरेशी याचेवर पोलीस स्टेशन नवेगाव बांध, जि गोंदीया, पोलीस स्टेशन कळमेश्वर, नागपुर ग्रामीण आणि सेवाग्रामा जि. वर्धा येथे गुन्हे नोंद आहे. टोळी सदस्य आरोपी शोहेब नौशाद सैयद याचेवर पोलीस स्टेशन कळमेश्वर, नागपुर ग्रामीण येथे गुन्हे नोंद आहे. टोळी सदस्य आरोपी मनोहर भोजराज मनगटे याचेवर पोलीस स्टेशन कळमेश्वर, नागपुर ग्रामीण आणि पोलीस स्टेशन सालेकसा जि गोंदयिा येथे गुन्हे नोंद आहे. टोळी सदस्य आरोपी इख्तियार कुरेशी मुश्ताक कुरेशी याचेवर पोलीस स्टेशन कळमेश्वर, नागपुर ग्रामीण आणि पोलीस स्टेशन यशोधरा नगर, नागपुर शहर येथे गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी क्रं १ ते ७ यांना अटक करण्यात आली आहे. तसेच टोळीतील इतर सदस्यांवर सुध्दा गोवंश जनावरे तस्करीचे अनेक गुन्हे नोंद आहे.

सदर टोळी प्रमुख हा आपले टोळीं सदस्यांकडुन महाराष्ट्र, मध्यप्रदेश व छत्तीसगड येथे अवैधरित्या गोवंश जनावरांची तस्करी करवुन घेत असतो. सदर टोळीतील सदस्य हे त्याचे सांगणेवरून अनेक राज्यातुन कत्तली करीता जनावरे वाहतुक करीत असतात. सदर टोळीतील सदस्य हे पोलीसांना व काही सामाजिक संस्थांना माहीती होवु नये म्हणुन विविध प्रकारची वाहने उदा. छोटे पिक अप व्हॅन, ॲम्ब्युलन्स अशाप्रकारची वाहने वापरुन आपला व्यवसाय करीत असतात. एकंदरीत टोळी प्रमुख हा वेगवेगळे सदस्यांना हाताशी धरून आपल्या आर्थीक फायदयासाठी निर्दयीपणे गोवंश जनावरांची कत्तलीकामी वाहतुक करून असे गुन्हे करतो.

**आरोपीतांवर अनेक गुन्हे नोंद असुन सुध्दा नमुद** आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. त्यामुळे नमुद १२ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९** ( **MCOCA** ) लावण्यात आला आहे.



मोहम्मद नासीर मोहम्मद शफी कुरेशी



सैयद सुल्तान उर्फ सोनु हमीद अली



आमीर रउफ कुरेशी



रफीक कुरेशी शेख सत्तार कुरेशी



शोहेब नौशाद सैयद



मनोहर भोजराज मनगटे



इख्तियार कुरेशी मुश्ताक कुरेशी

# पर्यावरणास अपायकारक तसेच जिवितास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २ गुन्हे नोंद

**पोस्टे नरखेड :—** दिनांक २९/१२/२०२५ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, इंदीरा नगर, नरखेड येथे **करीम मोहम्मद शेख, वय ६२ वर्ष, रा. इंदीरा नगर, नरखेड** हा आपले दुकानात प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि आरोपीच्या दुकानाची पंचासमक्ष घरझडती घेतली असता त्याचे ठेल्यामध्ये एका पांढऱ्या बोरीत नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीमध्ये गुंडाळलेला मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून मोनो काईट कंपनीचे एकुण ०४ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती २४००/— रूपये असा एकुण २४००/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम १२५, २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

**पोस्टे उमरेड :—** दिनांक २९/१२/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, महारानाप्रताप चौक, उमरेड मंगळवारीपेठ, उमरेड येथे **साहिल दिगांबर धारने, वय २३ वर्ष, रा. महारानाप्रताप चौक, उमरेड मंगळवारीपेठ** हा आपले राहते घरी प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे उमरेड पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि आरोपीच्या घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता पांढऱ्या रंगाच्या पोतली मध्ये नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीमध्ये गुंडाळलेला मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून मोनोकाइट फायटर कंपनीचे एकुण ०८ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ४०००/— रूपये असा एकुण ४०००/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम १२५, २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे दिनांक २४/१२/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ रोजीपर्यंत राबविण्यात येत आहे ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह ,अवैध दारू बाबत विशेष मोहीम

## विशेष मोहीमे अंतर्गत करण्यात आल्या मोटर वाहन अधिनियम अन्वये २३८ कारवाई आणि अवैध दारू बाबत १५ गुन्हे दाखल

नविन वर्षानिमीत्त नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विशेष मोहीमे अंतर्गत दिनांक २९/१२/२०२५ रोजी मोटार वाहन कायदा **कलम १८५ अन्वये ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह च्या ४० कारवाई,** तसेच विना हेल्मेट, विना परवाना, ओव्हर स्पीडच्या आणि **इतर १९८ कारवाई** अशा एकुण **२३८ कारवाई** केल्या आहे.

त्याचप्रमाणे सदर विशेष मोहीमे अंतर्गत दिनांक २९/१२/२०२५ रोजी अवैध दारू विक्रेते, दारू काढणारे तसेच सेवन कारणाऱ्यांवर कारवाई करत महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये विविध पोलीस स्टेशन अंतर्गत **एकुण १५ गुन्हे नोंद** करण्यात आले असुन सदर कारवाईत ३०७८० मिली देशी दारु, २३३०४० मिली विदेशी दारू, ७१ लीटर मोहाफुल दारू, वाहन तसेच इतर साहीत्य असा **एकुण १०,४९,०३२/— रूपयांचा मुद्देमाल** जप्त करून **एकुण १६ आरोपी** यांविरूद्ध गुन्हे नोंद करण्यात आलेले आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.

**मद्यप्राशन करून वाहन चालवितांना चालक मिळून आल्यास त्यांच्यावर मोटार वाहन कायदया अन्वये कारवाई करण्यात येईल सदर प्रकरणात मा न्यायालयाकडुन १०,०००/— रूपयांपर्यंत दंड होवु शकतो. नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे संपुर्ण जिल्हयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नववर्ष, तसेच इतर सणोत्सव आनंदात साजरा करावा परंतु स्वसुरक्षा म्हणुन वाहन चालवितांना मद्यप्राशन करून वाहन चालवू नये, हेल्मेट चा वापर करावा, वाहतुक नियमांचे पालन करावे. तसेच पालकांनी त्यांच्या अल्पवयीन पाल्यांना दुचाकी मोसा/चारचाकी वाहन चालविण्यास देवू नये अन्यथा चालकांविरूद्ध मोटार वाहन कायदयांन्वये गुन्हे दाखल करून कायदेशिर कारवाई करण्यात येईल.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन काटोलः—** दिनांक २९/१२/२०२५ रोजी काटोल पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता मौजा कोहळा परिसरात **आरोपी नामे राजु रखडु बिसांदे, वय ४० वर्ष, रा. कोहळा, ता. काटोल** हा स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. पोलीसांनी त्याला विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ७२१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ३०/१२/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७२१ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण १०० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २४ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २९ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २६ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २८ आरोपी अशा एकुण १६० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७२१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**








मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने